**MHKO100006132013**

**<u>आदेश निशाणी क्र. ५५</u>**

१.   प्रतिवादी क्र. १० ते १२ यांनी सदरचा अर्ज त्यांचे विरुध्द झालेला "विना कैफीयत" आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

२.   प्रतिवादी क्र. १० ते १२ यांचा अर्ज व वादी यांनी दाखल केलेले निशाणी क्र. ५६ वरील म्हणणे वाचले. दोन्ही बाजूचे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूचे विधीज्ञ यांनी त्यांचे अर्जातील व म्हणण्यातील कथनाप्रमाणे युक्तीवाद केला आहे.

३.   प्रतिवादी क्र. १० ते १२ यांचे असे कथन आहे की, वादी यांनी प्रतिवादी यांचे विरुध्द सदरचा दावा हक्काापनासाठी, वाटपासाठी, व कायम मनाई ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. सदरचे दावेचे समन्स व नोटीस प्रस्तुत प्रतिवादी यांना लागू झाली आहे व ते आपल्या वकीलामार्फत हजर झाले होते. परंतु प्रस्तुत प्रतिवादी यांनी आपली कैफीयत व म्हणणे दाखल न केलेने प्रतिवादी यांचे विरुध्द विना कैफीयत व विना म्हणणे आदेश पारीत झालेला आहे. प्रस्तुत प्रतिवादी ह्या लग्ने होवून इतरत्र राहणेस आहेत. प्रस्तुत कामी कैफीयत द्यावी लागत नाही, प्रतिवादी हे फॉर्मल पक्षकार म्हणून केलेले आहे व कोर्टात तुम्हाला हजर रहावे लागत नाही असे पुर्वीच्या वकीलांनी सांगितल्यामुळे प्रस्तुत प्रतिवादी यांनी त्यांची कैफीयत प्रस्तुत कामी दाखल केलेली नाही. परंतु सदर दावेचे कामी प्रतिवादी यांनी दुस-या वकीलांच्याकडून मार्गदर्शन घेतले असता कैफीयत द्यावी लागते असे समजून आले. म्हणून प्रस्तुत प्रतिवादी यांनी सदर अर्जासोबत कैफीयत दाखल केली आहे. प्रतिवादी हे वयस्क असून त्यांना कायद्याचे कोणतेही ज्ञान नाही. प्रस्तुतचा वाद हा वाटणीसाठी असलेने प्रतिवादी यांची कैफीयत सामील करुन घेवून प्रस्तुतचे काम गुणदोषावर चालून निर्णित होणे आवश्यक

आहे. तसे न झालेस दावेचे कामी गुंतागुंत निर्माण होवून अन्य दावे होण्याची शक्यता आहे. प्रस्तुतचा वाद हा स्थावर मिळकतीसंदर्भात असलेने प्रतिवादी यांनी कैफीयत दाखल करणेस जाणुनबुजून टाळाटाळ केलेली नाही. सबब वादी यांनी त्यांचे विरुध्द झालेला विना कैफीयत चा आदेश रद्द करणेत येवून कैफीयत कामात सामील करुन घेणेची विनंती केली आहे.

**४.** वादी यांनी सदरचे अर्जास आपले म्हणणे निशाणी क्र. ५६ येथे दाखल केले आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, अर्जातील मजकुर चुकीचा व लबाडीचा आहे. प्रतिवादी क्र. १० ते १२ हे प्रस्तुत दावेचे कामी दिनांक १३/०६/२०१४ रोजी ॲड. रेश्मा बुद्धयाण्णावर यांचे वकीलपत्र दाखल करुन हजर झालेले होते व कैफीयत व म्हणणे न दिलेने दिनांक ०६/०९/२०१४ रोजी विना कैफीयत आदेश पारीत झालेला आहे. प्रतिवादी यांनी सन २०१४ पासून आजअखेर १० वर्षाचे कालावधीमध्ये दावेस का कैफीयत दिली नाही याचे कारण व स्पष्टीकरण कोठेही नमुद केलेले नाही. प्रतिवादी हे Due diligent नाहीत. सबब सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करणेची विनंती केली आहे.

**५.** वादीतर्फे विधीज्ञ श्री. एस.बी.देसाई यांनी आपले युक्तीवादचे पृष्ठ्यर्थ मा. मुंबई उच्च न्यायालयाचे (नागपूर बेंच) **Rameshlal V/s. Yogesh (2015) 5 Mh.L.J. 188** या न्यायनिर्णयाचा आधार घेतला आहे. सदर न्यायनिर्यायामध्ये if reason pleaded appears satisfactory or sufficient to condone the delay. Delay may be so condoned subject to the payment of reasonable costs as well as suit is decided on merits and the real controversy between the parties is settled finally and effectively on merits in accordance with law असे अभिमत व्यक्त केले आहे.

**६.** वादी यांनी सदरचा दावा वाटपाकरीता, हक्कज्ञापन व कायम मनाईसाठी दाखल केला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तुत प्रतिवादी यांचे विरुध्द दिनांक ०६/०९/२०१४ रोजी विना कैफीयत आदेश पारीत करणेत आलेला आहे. त्यांनंतर प्रस्तुत प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज दिनांक ०६/०९/२०२३ रोजी दाखल केलेला आहे.

७.		प्रतिवादी क्र. १० ते १२ यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. दावा वाटपासाठी असलेने दाव्यात सर्व पक्षकार हे आवश्यक पक्षकार म्हणून सामील असणे आवश्यक आहे. दाव्याचा गुणदोषावर निकाल करणेसाठी प्रस्तुत प्रतिवादी क्र. क्र. १० ते १२ यांची कैफीयत अभिलेखावर येणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र. १० ते १२ यांची कैफीयत अभिलेखावर दाखल करुन घेतल्यामुळे वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे. प्रतिवादी यांचे अर्जातील कथनावर अविश्वास दाखविण्यासारखी परिस्थिती अभिलेखावर आलेली नाही. परंतु प्रतिवादी क्र. क्र. १० ते १२ यांनी आपली कैफीयत दाखल करणेस जवळजवळ ९ वर्षांचा उशीर केला हे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. वादी व प्रतिवादी यांचे नातेसंबंध विचारात घेता व दावा वाटपाचा असलेने प्रस्तुत प्रतिवादी यांचे दावा मिळकतीमध्ये हितसंबंध आहेत किंवा नाही हे निश्चित होणार आहे.

८.		अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र. १ ते ३ यांची निशाणी क्र. ३९ वरील कैफीयत दिनांक १८/०८/२०१८ रोजी अभिलेखावर दाखल केलेली आहे. त्यानंतर वादीतर्फे साक्षीदार क्र. १ यांचे निशाणी क्र. ३६ वरील सरतपासाचे प्रतिज्ञापत्रावर दिनांक ०६/०१/२०२३ रोजी प्रतिवादी यांचे विरुध्द उलटतपास नाहीचा आदेश झालेला आहे. प्रतिवादी क्र. १ ते ८ यांनी वेगवेगळे अर्ज देवून त्यांचे विरुध्द झालेला उलटतपास नाहीचे आदेश रद्द करुन घेतले आहेत. प्रतिवादी क्र. १ ते ८ यांनी वादीचा उलटतपास घेणेस सुरवात केलेली नाही. अशाप्रकारे प्रकरणात परिणामकारक चौकशी सुरु झालेली नाही. त्यामुळे मी या ठिकाणी आदरपुर्वक नमुद करावेसे वाटते की, वादीतर्फे दाखल **Rameshlal V/s. Yogesh** या निर्णयविधीमधील सारसुत्र पाहता तसेच दाव्यातील वस्तुस्थिती पाहता वर नमुद न्यायविधीतील सारसुत्र याअर्जाचे निर्गतीसाठी लागू करण्यास मदतीचे ठरतात. वादी व प्रतिवादी यांचे नातेसंबंध व दाव्याचा गुणदोषावर अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी प्रस्तुत प्रतिवादी यांची कैफीयत अभिलेखावर दाखल असणे जरुरीचे आहे. त्यामुळे तिवादी क्र. १० ते १२ यांनी केलेल्या प्रदीर्घ उशीराबाबत त्यांचेवर भरघोस खर्च

बसवून सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत वाटते. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**<u>आ दे श</u>**

**१)** प्रतिवादी क्र. १० ते १२ यांचा अर्ज वादी यांना खर्चादाखल रक्कम रुपये ३०००/- (अक्षरी रुपये तीन हजार मात्र) देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

**२)** प्रतिवादी क्र. १० ते १२ यांनी खर्चाची रक्कम वादी यांना दिल्यानंतर प्रतिवादी क्र. १० ते १२ यांची प्रस्तुत अर्जासोबत दिलेली कैफीयत अभिलेखावर दाखल करुन घेणेत यावी.

DHANASHRI MAHADEV PAWAR

Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2023.10.12 15:58:43 +0530

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक १०/१०/२०२३

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.
गडहिंग्लज